नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०४/०७/२०२६ (सोमवार )

---

# चोरीचे ४ गुन्हे उघड, ३ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०३/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून ३ बकरी चोरीचे गुन्हे आणि १ मोटर सायकल चोरीचा गुन्हा असे एकुण ४ गुन्हे उघड केले आहे.

पोलीस स्टेशन पचगाव येथील अप. क्र. ४१/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. चे तपासादरम्यान सदर गुन्हयात एक पांढऱ्या रंगाची होंडा सिटी कार क्र. एम एच—४३/व्ही—५०२५ या वाहनाचा उपयोग झाल्याचे निष्पन्न करून वाहनाचा शोध घेतला असता, दिनांक ०३/०७/२०२६ सदर वाहन हे बहादूरा फाटा उमरेड रोड येथुन ताब्यात घेतले. त्या वाहनामध्ये **आरोपी १) शाहिद फिरोज खान, वय २४ वर्ष, रा. ताजबाग नागपूर २) अब्दुल फैज अब्दुल रफिक, वय २३ वर्षे रा ताजबाग नागपूर** हे मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेऊन सदर गुन्हयाबाबत त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी त्यांच्या आणखी एका साथीदारांसह पाचगाव, कुही , मोहपा येथे बकरी चोरीचे गुन्हे केले असल्याची माहीती दिली तसेच एक मोटारसायकल नागपूर येथून चोरी केल्याचे सांगितले. तपासादरम्यान दिनांक ०३/०७/२०२६ रोजी चोरीच्या बकऱ्या विकत घेणारा **आरोपी क्रं**

**३) अब्दुल मदनी अब्दुल गणी, वय ३२ वर्ष, रा. ताजबाग नागपूर याला नागपूर** येथुन ताब्यात घेतले. **तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) गुन्हयात वापरलेले वाहन होंडा सिटी कार एम एच–४३/व्ही ५०२५ किंमती ५,००,०००/– रूपये २) आरोपी चोरी केलेली एक विनानंबरची हिरो पॅशन एक्स प्रो मोटारसायकल किंमती ४०,०००/– रूपये ३) ८ बकऱ्या किंमती ५०,०००/– रूपये ४) २ अँड्रॉइड मोबाईल किंमती २०,०००/– रूपये ५) चोरी केलेल्या बकऱ्या विक्री करून मिळालेले पैसे नगदी ७४,०००/– रूपये आणि इतर साहीत्य असा एकुण ६,८४,०५०/–रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

उघड झालेले गुन्हे

१) पोस्टे पाचगाव अप. क्र. ४१/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.
२) पोस्टे कुही अप. क्र ३६२/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.
३) पोस्टे मोहपा अप. क्र ०४/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.
४) पोस्टे कोतवाली,नागपूर शहर अप क्र ७९/२६ कलम ३०३ (२)भा.न्या.सं.




# शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी नागपूर ग्रामीण जिल्हयात शालेय बस/वाहन चालकांच्या विशेष बैठका आणि उपाययोजना

शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीच्या अनुषंगाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०४/०७/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन वडोदा, अरोली, देवलापार, भिवापूर आणि काटोल येथे शालेय बस आणि संबधित इतर वाहन चालक, वाहक तसेच संबंधित शाळांच्या प्रतिनिधींच्या विशेष बैठका आयोजित करण्यात आल्या. पोलीस स्टेशन वडोदा अंतर्गत के.जॉन पब्लीक स्कुल, आसोली, आयडीयल कॉन्व्हेंट गुमथळा आणि गुरूकुल इंटर नॅशनल स्कुल, वडोदा येथे बैठक घेतली. पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत तिरूपती इंटरनॅशनल पब्लिक स्कुल आणि कन्सेप्ट स्कुल ,काटोल येथे बैठक

घेण्यात आली. पोलीस स्टेशन अरोली, देवलापार आणि भिवापुर यांनी पोलीस स्टेशन येथे संबधितांची बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीस सर्वोच्च प्राधान्य देत शाळा व्यवस्थापनाला शालेय बसची फिटनेस, विमा, परवाना व इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवणे, बस चालक व अटेंडंट यांची चारित्र्य पडताळणी (Character Verification) करून त्यांच्या राहत्या पत्त्याची व इतर आवश्यक माहितीची नोंद ठेवणे तसेच सर्व शालेय बसमध्ये आवश्यक सुरक्षा सुविधा, प्रथमोपचार पेटी, अग्निशमन यंत्र व सीट बेल्टची व्यवस्था करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शालेय बस चालक व अटेंडंट यांना वाहन चालविताना मोबाईलचा वापर न करणे, मद्यपान करून वाहन न चालविणे, वेगमर्यादेचे पालन करणे, विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणीच चढविणे व उतरविणे, वाहनाच्या खिडक्यांना आवश्यक सुरक्षा जाळी व रॉड बसविणे, पावसाळ्यात ओव्हरहेड वीजतारा, मोठी झाडे व इतर धोकादायक ठिकाणी वाहन उभे न करणे, वाहन नियंत्रित वेगाने चालवून अचानक ब्रेक लावण्याची वेळ येणार नाही याची दक्षता घेणे तसेच सर्व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याशिवाय, शाळा सुरू होण्याच्या व सुटण्याच्या वेळेत शाळा परिसरात पोलीस पेट्रोलिंग वाढविण्यात आली असून वाहतूक नियंत्रणासाठी विशेष पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. सदर बैठकींना संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शाळांचे प्रशासकीय अधिकारी, शालेय बस चालक, वाहक व अटेंडंट उपस्थित होते.

पोलीस स्टेशन काटोल








पोलीस स्टेशन वडोदा


TO SUCCEED IN YOUR MISSION,
YOU MUST HAVE SINGLE-MINDED
DEVOTION TO YOUR GOAL




**पोलीस स्टेशन अरोली**



## पोलीस स्टेशन देवलापार



## पोलीस स्टेशन भिवापुर



# खापा पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध जुगाराच्या गुन्हयातील सराईत गुन्हेगार नितेश सुधाकर नंदनवार यास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन खापा हदद्दीतील अवैध जुगार व्यवसायात सक्रिय आरोपी नितेश सुधाकर नंदनवार, वय ३३ वर्ष, रा. बाजार चौक खापा, ता. सावनेर, जि. नागपूर यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ)(ब) अन्वये नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार केले.**

सराईत गुन्हेगार नामे **नितेश सुधाकर नंदनवार, वय ३३ वर्ष, रा. बाजार चौक खापा, ता. सावनेर, जि. नागपूर** याचे विरूध्द अवैध जुगार बाबत अनेक गुन्हे नोंद असून नमुद आरोपी हा असे गुन्हे करण्याच्या सवयीचे आहे. त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे असामाजिक प्रवृत्तीला चालना मिळत होती तसेच नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्याचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. तसेच त्याच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करू**न वर नमुद आरोपी नितेश सुधाकर नंदनवार, वय ३३ वर्ष, रा. बाजार चौक खापा, ता. सावनेर, जि. नागपूर याला ०१ महीन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्‌दपार आरोपी नितेश सुधाकर नंदनवार**

# विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वेलतुर येथे अप क्र. २१/२०२२ कलम ३५४,३२३,५०६ भादवी अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक २३/०२/२०२२ रोजी यातील **आरोपी नामे गोलु नथ्थुजी भोयर, वय २३ वर्षे, रा. रत्नापुर, ता. कुही, जि. नागपुर** याने सदर गुन्हयातील पिडीत /फिर्यादी ही आपल्या कुटुंबासह गावातील एका कार्यक्रामत जावुन जेवण करून तिच्या मोठया बहीणसह घराकडे परत जात असतांना यातील आरोपी तिच्या मागुन येवुन तिचा हात जबरदस्तीने पकडुन तिला अश्लिल स्पर्श करून तिचा विनयभंग केला.तसेच तिला धमकी दिली आणि मारहाण केली.

श्रीमती स्वाती लोखंडे, महीला पोलीस हवलदार, ब.न १७४३ नेम पोलीस स्टेशन वेलतुर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक ०४/०७/२०२६ रोजी मा. प्रथमश्रेणी न्यायधीश, कुही श्री पी.के. मुटकुळे यांनी नमुद आरोपी नामे गोलु नथ्थुजी भोयर, वय २३**

**वर्षे, रा. रत्नापुर, ता. कुही, जि. नागपुर यास कलम ३५४ मध्ये दोषी ठरवुन त्याला १ वर्ष सश्रम कारावास व ५००० /— रूपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने सरकारी अभियोक्ता श्रीमती वसुंधर ए. फुले यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग, (प्रभार उमरेड उपविभाग ) पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन वेलतुर , पोलीस निरीक्षक यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार पोअं मनोज मुटकुरे ब. नं. २२९६ यांनी मदत केली आहे.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ०३/०७/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, चारचाकी वाहनाने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील मौजा पांढुर्णा ते सावनेर रोड भागेमाहेरी शिवार येथे नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान संशयित मारूती सुझुकी ब्रेझा वाहन क्र. एम एच—४३/ए डब्ल्यु—१८३२ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाची तपासणी केली असता प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **आरोपी नामे १) जय रवि कडु, वय २८ वर्ष, रा. वार्ड नं. १, खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपूर यास ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली असता सदर तंबाखु विक्री करण्यासाठी अवैधरित्या चारचाकी वाहना मध्ये प्रतिबंधीत सुगंधी तंबाखु वाहतुक केल्याची माहीती प्राप्त झाली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष वेगवेगळया कंपनीचा सुगंधित तंबाखु आणि पानमसाला एकुण १९.६०० किलोग्रॅम किंमती ३२,६००/—रूपये, ०१ मोबाईल, चारचाकी वाहन किंमती ५,००,०००/—रूपये असा एकुण ५,४२,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपींनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७७३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०४/०७/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७७३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४२ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १४ आरोपी अशा एकुण १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :–** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५५ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३८ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी

आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १५० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १९  आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १९ आरोपी अशा एकुण ७३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे ३२ आरोपी अशा एकुण १३२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ६० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३९ आरोपी अशा एकुण १८८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.






पारशिवनी
न नं. : ०७१०२-२२५१२३


पोलीस स्टेशन कुही


पोलीस ठाणे वडोदा
जि. नागपुर (ग्रा.)


पोलीस ठाणे जलालखेडा




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने